I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 456-461 OPEN ACCESS e-ISSN 2347 – 517X
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article

Reg. No.: MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# वृद्धांच्या समस्या आणि अधिनियम २००७

आर. एस. बिरादार
सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर

Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश**
भारतात वृद्धांची संख्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत १२.२ पर्यंत पोहोचली आहे. वृद्धांच्या वाढत्या संख्येबरोबरच त्यांच्या समस्या देखील वाढत आहेत. बदलती सामाजिक परिस्थिती वृद्धांच्या समस्येसाठी कारणीभूत आहे. त्यामुळे वृद्धांच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक, स्वास्थ्य विषयक, कौटुंबिक, सामाजिक दर्जा विषयक समस्या निर्माण झाले आहेत. वृद्धांच्या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी भारत सरकारने 'Maintenance and welfare of parents and senior citizen act 2007' हे बिल २९ डिसेंबर २००७ रोजी पास करण्यात केले. केंद्र सरकारचा हा कायदा राबविण्याची प्रक्रिया राज्य सरकारची आहे म्हणून महाराष्ट्रात हा कायदा १ मार्च २००९ ला लागू करण्यात आला. प्रस्तुत संशोधनामध्ये अधिनियम २००७ या कायद्याच्या अनुषंगाने वृध्दाच्या समस्येच्या संदर्भात तत्कालीन परिस्थितीचे अध्ययन करण्यात आले आहे.

२००७ च्या या अधिनियमाने वृद्धांचा सांभाळ, चरितार्थ, देखभाल याची सर्व जबाबदारी पाल्याची राहील अशी तरतूद करण्यात आली परंतु समाजात काही पाल्य वृद्धांचा सांभाळ, चरितार्थ व देखभाल करत नाहीत. अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय सोयी उपलब्ध करून देत नाहीत. या कायद्याने दिलेल्या जबाबदारीपासून पाल्य दूर जात आहेत. या अधिनियमाद्वारे राज्य सरकार अथवा सामाजिक संस्था द्वारा वृद्धाश्रमाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली असली तरीही वृद्धांची वाढती संख्या आणि त्यांच्या समस्या मधील वृद्धी पाहता वृद्धाश्रमाची संख्या कमी आहे. वृद्धांनी स्वत:च्या मालकीची मालमत्ता अथवा स्वत:च्या कमाई मधून चरितार्थ चालवण्यास असमर्थ असतील तर आपल्या पाल्य कडून निर्वाह भत्ता मागण्याची तरतूद करण्यात आली परंतु काही मोजकीच प्रकरणे न्यायाधीकरणाकडे येतात बहुतेक वृद्ध या कायद्याच्या प्रक्रियेत पडू पाहत नाहीत. वृद्धावस्थेत स्वास्थ्यांच्या समस्या निर्माण होतात या समस्या दूर करण्यात त्यांचे पाल्य व संबंधित राज्य या दोघांचीही भूमिका महत्त्वाची आहे. परंतु सद्यस्थितीत या दोघांकडूनही वृद्धासाठी दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सोयी सुविधा या अपुऱ्या पडत आहेत. २००७ च्या अधिनियमाला आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्र आणि जनप्रचार माध्यमा द्वारे जनमानसात प्रसिद्धी करण्याची तरतूद करण्यात आली. परंतु आजही ग्रामीण भागापर्यंत हा कायदा पोहचला नाही. या कायद्याला हवी तेवढी प्रसिद्धी मिळालेली नाही. हा कायदा तयार झालेल्या कालावधी पासून जर वृद्धांनी आपली संपत्ती आपल्या पाल्याच्या नावावर हस्तांतरित केल्यानंतर हे पाल्य वृद्धांची देखभाल, सांभाळ करत नसतील तर ती संपत्ती मुलाकडून काढून घेऊन परत वृद्धांच्या नावावर करण्याचा अधिकार न्यायाधीकरणाला या कायद्याने दिला आहे परंतु ही प्रक्रिया क्वचित प्रसंगीच पाहायला मिळते. वृद्धांना उघड्यावर सोडून देणे किंवा त्याचा त्याग करणे या कायद्याने गुन्हा निश्चित केला असून तशा अपराध्यास शिक्षेची देखील तरतूद करण्यात आली आहे. वृद्धांना सोडून देणे अथवा त्याग केल्यावरही तशा पाल्यावर गुन्हाही होत आणि नाही त्या गुन्ह्याची दखलही कोणी घेत नाही.

**बिजसंज्ञा :** वर्तमानपत्र संघर्षाची समस्या वृद्धावस्था दूरचित्रवाणी

**प्रस्तावना :**

भारतात वृद्धांची संख्या २०११ च्या जनगणनेनुसार १०४ लाखापर्यंत पोहोचली आहे. त्यामध्ये ५१ लाख पुरुष ५३ लाख महिला आहेत. वृद्धांच्या वाढत्या संख्येबरोबरच त्यांच्या समस्या देखील वाढत आहेत. संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, औद्योगीकरण व नागरीकरणात वाढ, जाती व्यवस्थेतील परिवर्तन, सरासरी आयुर्मानात होणारी वाढ, वृद्धांचे आर्थिक परावलंबन, सामाजिक मूल्यातील बदल इत्यादी घटकातील बदलती सामाजिक परिस्थिती वृद्धांच्या समस्येसाठी कारणीभूत आहे. त्यामुळे वृद्धांच्या शारीरिक,

मानसिक, आर्थिक, स्वास्थ्य विषयक, कौटुंबिक, सामाजिक दर्जा विषयक समस्या निर्माण झाल्या आहेत.

वृद्धपकाळात शरीर थकणे, रोगप्रतिकारशक्तीचा ऱ्हास, हृदय किडनी व पचनसंस्था चांगली नसणे, कार्यशक्ती कमी होणे, डोळयाला कमी दिसणे, कानाला ऐकू न येणे इत्यादी शारीरिक समस्या उद्‌भवतात. विचारशक्तीचा ऱ्हास होतो. त्यांचा चिडचिडपणा वाढतो. विसराळू बनतात तसेच वृद्धांमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होण्यासारख्या मानसिक समस्या निर्माण होतात. वृद्धावस्थेत कार्यक्षमता कमी होऊन उत्पादनात सहभाग कमी असल्याने त्यांच्या आर्थिक समस्या उद्‌भवल्या. प्रामुख्याने ही आर्थिक समस्या असंघटित क्षेत्रात दिसून येते. वृद्धांची प्रतिकारशक्ती कमी असल्याने अनेक आजारांना बळी पडून स्वास्थ्य चांगले नसण्याची समस्या निर्माण झाली. या काळात वृद्धांना देखभाल आणि चिकित्सा सुविधांची आवश्यकता असते. कुटुंबामध्ये अनेक पिढ्यचे व्यक्ती राहताना त्यांच्यात वैचारिक भिन्नता असल्यामुळे आंतरपिढीय संघर्षाची समस्या (problem of Intra generational conflict) ची समस्या निर्माण झाली आहे. "आज कि युवा पीढी वृद्धो बीच अंतरपीढीय अन्तराल (Intergenerational Gap) निरन्तर बढता जा राहा है जिसके फलस्वरूप अंतरपीढीय तनाव एवं अंतरपीढीय संघर्ष मे वृद्धि हुई है"१ वृद्धांना जो पूर्वी मानसन्मान मिळत होता तसा मानसन्मान मिळत नसल्यामुळे त्यांच्यात वैफल्याची भावना निर्माण होऊन वृद्धांच्या सामाजिक दर्जाची देखील समस्या निर्माण झाली आहे.

**संशोधनाची उदिद्ष्टये:**

१. अधिनियम २००७ च्या अनुषंगाने वृद्धांच्या वर्तमान परिस्थितीचे अध्ययन करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनासाठी ग्रंथ, संशोधन अहवाल, वैयक्तिक लेख, वर्तमान पत्रे, साप्ताहिके, मासिक इत्यादी व्दितीयक तथ्य सामग्रीचा उपयोग करण्यात आला.

**वृद्धत्व संकल्पना ( Concept of old age) –**

सामान्य जीवनाचा अंतिम टप्पा म्हणजे वृद्धावस्था होय. मानवी जीवनाचे विकासाच्या प्रक्रियेनुसार बाल्यावस्था, किशोरावस्था, प्रौढावस्था आणि वृद्धावस्था अशा अवस्था आहेत. त्यामधील अंतिम अवस्था म्हणजे वृद्धावस्था होय. या अवस्थेत दृष्टीत बदल होतो. केसातील मेलॅनीन हे द्रव्य कमी झाल्यामुळे केस पांढरे होतात. केसांना गळती लागून डोक्यावर टक्कल पडते. शारीरिक ठेवणीत परिवर्तन होते. शरीरावर सुरकुत्याची निर्मिती, श्रवण इंद्रियाद्वारे कमी ऐकू येणे, श्वसन संस्थेत बदल, हृदयाचे कार्य व रक्तदाबातील परिवर्तन, मज्जासंस्थेत परिवर्तन, झोप कमी येणे, पोट बिघडणे, कामवासनेची भावना कमी होणे, स्त्रियांची मासिक पाळी बंद होणे इत्यादी शारीरिक बदल घडून येतात. अचानक भावना विवश होणे, रागावणे, सतत बोलत राहणे, चिंतित असणे, निराश होणे, विसरभोळेपणा वाढणे, विचारशक्तीचा ऱ्हास होणे इत्यादी मानसिक बदल घडून येतात. वृद्धावस्थेची सुरुवात वयाच्या कोणत्या वर्षापासून होते याबाबतीत विचारवंताची वेगवेगळी मते आहेत. विभिन्न देशात वयाची मर्यादा ही वेगवेगळी आहे. भारतात मात्र ६० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वय झालेल्या व्यक्तीला वृद्ध समजले जाते. कारण वयाची साठ वर्षे पूर्ण झाली की व्यक्ती सेवानिवृत्त होतात म्हणजेच थोडक्यात व्यक्तीच्या वयाच्या साठव्या वर्षा नंतरचा जो अंतिम टप्पा असतो त्यास वृद्धावस्था असे म्हणतात. २००७ च्या कायद्यानुसार वृद्धावस्था म्हणजे "senior citizenmeans any person being a citizen of India, who has attained the age of sixty years or above"

भारतातील वृद्धांची लोकसंख्या (senior Citizen Population of India)

**२००७ च्या अधिनियमाची पार्श्वभूमी–**

वृद्धांच्या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी केंद्र सरकारने संविधानातील राज्यच्या मार्गदर्शनासाठी दिलेल्या मार्गदर्शक तत्वातील कलम ४१ मध्ये वृद्धांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करण्याची तरतूद करण्यात आली. त्याला अनुसरून भारत सरकारने Maintenance and welfare of parents and senior citizen act2007हे बिल २९ डिसेंबर २००७ रोजी पास करण्यात आले. या कायद्यात वृद्धांच्या सामाजिक सुरक्षेसाठी ३२ कलम असून ते सात प्रकरणात विभाजित करण्यात आले आहेत. केंद्र सरकारचा हा कायदा राबविण्याची प्रक्रिया राज्य सरकारची आहे म्हणून महाराष्ट्रात हा कायदा १ मार्च २००९ ला लागू करण्यात आला. त्याचा फारसा प्रभाव समाजावर पडलेला नाही. प्रस्तुत संशोधनामध्ये अधिनियम २००७ या कायद्याच्या अनुषंगाने समाजातील वृद्धांच्या वर्तमान परिस्थितीचे अध्ययन करण्यात आले आहे.

तथ्याचे विश्लेषणात्मक निर्वचन

**१) निर्वाह भत्ता**

“ज्या वृद्धाना वेतन मिळते त्यांची विशेष अशी आर्थिक समस्या नसते. परंतु जे लोक नोकरी करत नव्हते मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करायचे अशा वृद्धांच्या मात्र आर्थिक समस्या गंभीर आहेत मुला मुलींची लग्न झाल्यानंतर असे वृद्ध एकाकी पडतात त्यांचा कोणत्याच प्रकारचा आर्थिक स्त्रोत नसतो”३ अशा वृद्धांना निर्वाह भत्त्याची आवश्यकता असते. त्यासंदर्भात कायद्यात तरतूद करण्यात आली.

अधिनियमाच्या प्रकरण दोन मधील धारा चार ते अठरा यामध्ये निर्वाह भत्ता याविषयी तरतूद करण्यात आली आहे. वरिष्ठ नागरिक व आई वडील यांच्या चरितार्थाचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यांच्या निर्वाह खर्चासाठी ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरणाकडे अर्ज करू शकतात. न्यायाधीकरणाकडे त्यांचा अर्ज आल्यानंतर हा अर्ज मंजूर का करू नये यासाठी विरोधी पक्षाकडे कारणे दाखवा नोटीस पाठवतात. त्यानंतर लेखी उत्तरासह विरोधी पक्षाला सुनावणीस उपस्थित राहावे लागते. न्यायाधिकरणाच्या चौकशीनंतर दावा मान्य झाल्यास दोन्ही पक्षकाराने समेट घडवून आणल्यास तसा आदेश न्यायाधिकरणाकडून काढण्यात येतो. जर समेट झाला नसेल तर न्यायाधिकरणाने पुढील बाबीचा विचार करून निर्वाह भत्ता निश्चित करतात.

अ) अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्यासाठी लागणारी रक्कम

ब) विरोधी पक्षकाराचे वार्षिक उत्पन्न

क) अर्जदाराच्या मालमत्तेची किंमत किंवा त्यापासून मिळणारे उत्पन्न

वरील बाबीचा विचार करून निश्चित केलेल्या निर्वाह भत्त्याच्या रकमेचा आदेश न्यायाधिकरणाकडून काढण्यात येतो. कमाल निर्वाह भत्ता दहा हजार रुपये किंवा विरोधी पक्षाला मिळणाऱ्या एकत्रित मासिक उत्पन्न भागिले परिवारातील सदस्य संख्या याप्रमाणे येणाऱ्या रकमेपेक्षा जास्त नसावा अशा प्रकारे निश्चित केलेल्या निर्वाह भत्त्याचा आदेश न्यायाधिकरणाकडून काढण्यात येतो. याबाबतीत कायद्यात संशोधन करण्यात आले आहे. विरोधी पक्षाला न्यायाधिकरणाने ज्या पद्धतीने निर्वाह भत्ता जमा करण्यास सांगितले त्याप्रमाणे तीस दिवसाच्या आत जमा करावे लागते. आवश्यकता भासल्यास अपिलीय न्यायाधिकरणाकडेही जाण्याविषयीची तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे.

**२) वृद्धाश्रमाची स्थापना**

अधिनियमाच्या प्रकरण तीन मध्ये धारा १९ नुसार राज्य सरकारने टप्प्याटप्प्याने वृद्धाश्रमाची स्थापना करेल व त्याचे व्यवस्थापन देखील करेल अशी तरतूद करण्यात आली. वृद्धाश्रमाची स्थापना करण्याच्या नियमात बदल करण्यात आला या कायद्यात संशोधन करून ही जबाबदारी केवळ राज्य सरकारची नसून त्यांच्याबरोबर सामाजिक संस्थेकडेही देण्यात आली आहे. यापुढे सामाजिक संस्था देखील वृद्धाश्रमाची स्थापना करू शकतील परंतु यावर राज्य सरकारचे नियंत्रण असेल. सुरुवातीला प्रत्येक जिल्ह्यात गरीब व ज्यांना आश्रय नाही अशा १५० ज्येष्ठ नागरिकांना राहता येईल असे किमान एक तरी वृद्धाश्रम स्थापन करेल. राज्य सरकार वृद्धाश्रमाच्या व्यवस्थापना विषयीचा मानदंड निश्चित करेल व चिकित्सा सुविधा व मनोरंजनाच्या सोयी देखील त्यामध्ये अंतर्भूत असतील अशी तरतूद करण्यात आली. व्यवस्थापनाची सर्व जबाबदारी राज्य सरकारकडे राहील. "The State Government may establish and maintain such number of oldage homes at accessible places, as it may deem necessary, in a phased manner, beginning with at least one in each district to accommodate in such homes a minimum of one hundred fifty senior citizens who are indigent."

**३) ज्येष्ठ नागरिकांना चिकित्सा सुविधा**

अधिनियमाच्या प्रकरण चार मध्ये धारा २० नुसार गरीब जेष्ठ नागरिकाच्या चिकित्सा सुविधाची जबाबदारी राज्य सरकारकडे दिली. या कायद्यातील तरतुदीनुसार राज्य सरकार खालील बाबी निश्चित करेल.

अ) सर्वच प्रकारच्या दवाखान्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी बेड्स उपलब्ध असतील.

ब) ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळ्या रांगाची व्यवस्था करावी.

क) ज्येष्ठ नागरिकाच्या रोगावरील उपचाराच्या सुविधाचा विस्तार केला जावा.

ड) ज्येष्ठ नागरिकाच्या रोगाविषयीच्या संशोधनाला चालना द्यावी.

ई) प्रत्येक जिल्हा रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव सुविधा देण्याची तरतूद करण्यात आली. त्यामध्ये जराचिकित्सा वैद्यकीय अधिकाऱ्याची भूमिका महत्त्वाची असेल.

**४) कायद्याची प्रसिद्धी**

२००७ च्या अधिनियमाला आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्र आणि जनप्रचार माध्यमा द्वारे जनमानसात प्रसिद्धी करण्याची तरतूद प्रकरण पाच मधील धारा २१ मध्ये करण्यात आली. प्रचार व जनजागरणाची जबाबदारी राज्य सरकारकडे दिली आहे. यासाठी टेलिव्हिजन, रेडियो, समाज माध्यमाचा उपयोग करावा. केंद्र आणि राज्य सरकारचे कर्मचारी, पोलीस व न्यायव्यवस्थेतील सर्वांनाच जागृतीचे प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. "But what is even more concerning is that not many are aware of a law that protects senior citizen from abuse and abandonment maintenance and welfare of parents and senior citizen act 2007."

**५) मालमत्तेचे हस्तांतरण शून्यवत करण्याचा अधिकार**

अधिनियमाच्या प्रकरण पाच मधील कलम २२ व २३ मध्ये ज्येष्ठ नागरिकाकडून पाल्याकडे हस्तांतरित मालमत्तेच्या मालकीच्या संदर्भात तरतूद करण्यात आली. हा कायदा लागू झाल्यापासून ज्येष्ठ नागरिकाकडून पाल्यांकडे हस्तांतरित झालेल्या मालमत्तेच्या केसेसलाच लागू आहे. २००७ पूर्वीच्या केसेसला हा कायदा लागू नाही. या कायद्यातील तरतुदीनुसार ज्या वृद्धांचे देखभाल चरितार्थ होत नाही व पाल्याकडून हेळसांड होते. पाल्य त्यांचा सांभाळ करत नसतील तर त्या ज्येष्ठ नागरिकांनी न्यायाधिकरणाकडे तशी तक्रार केल्यास ज्येष्ठ नागरिकांनी आपली स्वत:ची मालमत्ता पाल्याच्या नावावर केली त्याची चौकशी करून परत घेण्याचा अधिकार न्यायाधिकरणाला

दिला आहे. "The State Government shall prescribe a comprehensive action plan for providing protection of life and property of senior citizens."याविषयीचे नियोजन राज्य सरकारे करतील.

**६) ज्येष्ठ नागरिकांना संरक्षण**

प्रकरण सहा मध्ये ज्येष्ठ नागरिकांना संरक्षण देण्यात आले. यामध्ये कलम २४, २५ नुसार मुलांनी त्यांच्या पालकांना सार्वजनिक ठिकाणी सोडून देणे किंवा त्यांचा त्याग करणे ही बाब या कायद्याअंतर्गत गुन्हा ठरविण्यात आली आहे. यानुसार झालेला गुन्हा दखलपात्र आणि जामीन योग्य आहे. दंडाधिकाऱ्याच्या चौकशी अंती गुन्हा सिद्ध झाल्यास तीन महिन्यापर्यंत कारावासाची शिक्षा पाच हजार रुपये दंड अथवा यापैकी दोन्ही अशा प्रकारच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली. यामध्ये संशोधन करून शिक्षेचे स्वरूप बदलण्यात आले.

**७) प्रकरण सात**

या अधिनियमातील प्रकरण सात मध्ये कायद्यातील तरतुदीनुसार कार्य पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक अधिकाऱ्यास 'लोकसेवक' मानण्यात आले. तसेच या अधिनियमातील कायद्यानुसार अंमलबजावणी करताना कर्मचाऱ्याकडून काही चूक झाली असेल आणि त्यांची कृती सदभावपूर्वक असेल तर त्यांच्यावर कसलीही कारवाई करण्यात येणार नाही अशी तरतूद करून कर्मचाऱ्यांना एक प्रकारचे संरक्षण देण्यात आले.

**निष्कर्ष–**

१) २००७ च्या या अधिनियमाने वृद्धांचा सांभाळ, चरितार्थ, देखभाल याची सर्व जबाबदारी पाल्याची राहील अशी तरतूद करण्यात आली परंतु समाजात काही मुलं–मुली वृद्धांचा सांभाळ, चरितार्थ व देखभाल करत नाहीत. अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय सोयी उपलब्ध करून देत नाहीत. या कायद्याने दिलेल्या जबाबदारीपासून पाल्य दूर जात आहेत.

२) या अधिनियमाद्वारे राज्य सरकार अथवा सामाजिक संस्था द्वारा वृद्धाश्रमाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली असली तरीही वृद्धांची वाढती संख्या आणि त्यांच्या समस्या मधील वृद्धी पाहता वृद्धाश्रमाची संख्या कमी आहे.

३) वृद्धांनी स्वत:च्या मालकीची मालमत्ता अथवा स्वत:च्या कमाई मधून चरितार्थ चालवण्यास असमर्थ असतील तर आपल्या रक्ताच्या नातेसंबंधीया कडून निर्वाह भत्ता मागण्याची तरतूद करण्यात आली परंतु काही मोजकीच प्रकरणे न्यायाधिकरणाकडे येतात बहुतेक वृद्ध या कायद्याच्या प्रक्रियेत पडू पाहत नाहीत.

४) वृद्धावस्थेत स्वास्थ्यांच्या समस्या निर्माण होतात या समस्या दूर करण्यात त्यांचे पाल्य व संबंधित राज्य या दोघांचीही भूमिका महत्त्वाची आहे. परंतु सद्यस्थितीत या दोघांकडूनही वृद्धासाठी दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सोयी सुविधा या अपुऱ्या पडत आहेत.

५) २००७ च्या अधिनियमाला आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्र आणि जनप्रचार माध्यमा द्वारे जनमानसात प्रसिद्धी करण्याची तरतूद करण्यात आली. परंतु आजही ग्रामीण भागातील वृद्धांना आपल्या बाबतीत समस्या निर्माण झाल्यास त्यावर उपाय म्हणून कोठे न्याय मागावा व याबाबतीत शासनाने कोणते कायदे केले आहेत अशा कायद्याविषयीची माहिती नाही. हा कायदा तयार होऊन जवळ जवळ पंधरा वर्षे कालावधी उलटून गेला तरीही आजही ग्रामीण भागापर्यंत हा कायदा पोहोचू शकला नाही. या कायद्याला हवी तेवढी प्रसिद्धी मिळालेली नाही.

६) २००७ चा कायदा तयार झालेल्या कालावधी पासून जर वृद्धांनी आपली संपत्ती आपल्या पाल्याच्या नावावर हस्तांतरित केल्यानंतर हे पाल्य वृद्धांची देखभाल, सांभाळ

करत नसतील तर ती संपत्ती मुलाकडून काढून घेऊन परत वृद्धांच्या नावावर करण्याचा अधिकार न्यायाधिकरणाला या कायद्याने दिला आहे परंतु ही प्रक्रिया क्वचित प्रसंगीच पाहायला मिळते.

७) वृद्धांना उघड्यावर सोडून देणे किंवा त्याचा त्याग करणे हे या कायद्याने गुन्हा निश्चित केला असून तशा अपराध्यास शिक्षेची देखील तरतूद करण्यात आली आहे. वृद्धांना सोडून देणे अथवा त्याग केल्यावरही पाल्यावर गुन्हाही होत नाही त्या गुन्ह्याची दखलही कोणी घेत नाही.

८) वृद्धांच्या बाबतीत कायदा अस्तित्वात असताना सुद्धा अशी परिस्थिती निर्माण होणे ही बाब मानवी अधिकाराचे उल्लंघन करणारी आहे.

९) राज्याचे कल्याणकारी उद्दिष्ट असताना देखील भारतातील वृद्धांच्या समस्येची परिस्थिती कल्याणकारी राज्याच्या विरुद्ध असलेली दिसून येते.

**संदर्भ :**

शर्मा, जी. एल.,(२०१७),सामाजिक मुद्दे, जयपूर: रावत पब्लिकेशन पृ.क्र. ६३

https://www.indiacode.nic.in/bitstream/123456789/6831/1/maintenance_and_welfare_of_parents_and_senior_citizens_act.pdf p.2

आगलावे डॉ, प्रदिप (२००९), भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन पृ. क्र. १८४

https://www.indiacode.nic.in/bitstream/123456789/6831/1/maintenance_and_welfare_of_parents_and_senior_citizens_act.pdf p.6

Ahuja, Ram (2021), Social Problems in India, Jaypur: Rawat Publication P.128

https://www.indiacode.nic.in/bitstream/123456789/6831/1/maintenance_and_welfare_of_parents_and_senior_citizens_act.pdf p.7